सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ)
पदावरुन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त
(गट-अ) या पदावर पदोन्नती व पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन आदेश क्र. पसंप्र-२०१६/प्र.क्र.२७३/पदुम-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ मे, २०१८.

वाचा:- शासन आदेश समक्रमांक दि.३१.०५.२०१७.

शासन आदेश :-

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन या संवर्गातून उपआयुक्त पशुसंवर्धन या संवर्गात पदोन्नती देण्याबाबत सन २०१६-१७ च्या निवडसूचीत समाविष्ट २६ अधिकाऱ्यांपैकी २० अधिकाऱ्याच्या पदोन्नतीचे आदेश दि.३१.०५.२०१७ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.डॉ. आर.डी.देशपांडे (खुला वर्ग) हे २६ अधिकाऱ्यांच्या निवडसूचीत समाविष्ठ होते व गोपनीय अहवालाच्या आधारे त्यांना विभागीय पदोन्नती समितीने पदोन्नतीस पात्र ठरविले होते. तथापि, डॉ.देशपांडे यांच्या विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या पदोन्नतीच्या आदेश निर्गमित करण्यात आले नव्हते. दरम्यान डॉ.आर.डी.देशपांडे यांच्या विरुध्दच्या विभागीय चौकशी प्रकरणी दि.२९.०१.२०१८ च्या शासन आदेशान्वये त्यांना दोषमुक्त केले. डॉ.आर.डी.देशपांडे,सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांना विभागीय चौकशी प्रकरणी दोषमुक्त करण्यात आले असल्याने त्यांना उपआयुक्त पशुसंवर्धन पदावर पदोन्नती देण्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

२. सबब, सन २०१६-१७ च्या उपायुक्त पदोन्नतीच्या निवडसूचीत समाविष्ट असलेले डॉ. आर.डी. देशपांडे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट-अ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ५७००) यांना उपायुक्त पशुसंवर्धन गट-अ (वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ६६००) या पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्तंभ क्रमांक ४ येथे नमूद ठिकाणी करण्यात येत आहे.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	प्रवर्ग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचे ठिकाण
१	२	३	४
१.	डॉ. आर.डी.देशपांडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर	खुला	जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, जि. भंडारा.

३. सदर पदोन्नती ही पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पूरत्या ज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून भरण्याबाबत साप्रवि/१६-ब/यांनी दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनानूसार सदर मान्यता देण्यात येत आहे.

४. या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यास नियमित पदोन्नतीचे म्हणजेच ज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

५. डॉ.आर.डी.देशपांडे यांना पदोन्नतीच्या पदावर हजर होण्यासाठी संबंधित नियंत्रण अधिकारी यांनी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०५२८१५०२२८२८०१ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shri Ravindra Gurav

Digitally signed by Shri Ravindra Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, cn=Shri Ravindra Gurav
Date: 2018.05.28 15:02:17 +05'30'

(रविंद्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध,पुणे-०७.
२) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग,नागपूर.
३) सहआयुक्त पशुसंवर्धन (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,चंद्रपूर.
५) जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,भंडारा.
६) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,जिल्हा परिषद,चंद्रपूर.
७) महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परिक्षा) मुंबई/नागपूर.
८) जिल्हा कोषागार अधिकारी,चंद्रपूर/भंडारा.
९) संबंधित अधिकारी,द्वारा आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०) निवडनस्ती-१.